© 2022 IJNRD | Volume 7, Issue 12 December 2022 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे योगदान

**संशोधक विद्यार्थी :- नाईक निलेश अशोक**
**(के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक जि.नाशिक)**
**संशोधक मार्गदर्शक :- डॉ. डी.जी. उशीर**
**(कला व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, सातपुर, नाशिक जि. नाशिक)**

**सारांश :**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. स्थानिक ठिकाणी कोणतेही उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध नसल्यामुळे या आदिवासी भागात बेरोजगारीचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे आदिवासी भागातील लोक हे बेकारीचे व दारिद्रय रेषेखालील जीवन जगतात. या आदिवासी लोकांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी व त्यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने स्थरावर अनेक योजना आखल्या जातात. त्यापैकीच एक महत्वाची योजना म्हणजे महाराष्ट्र रोजगार हमी योजना होय. प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात राबवली जाणारी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या विकासात्मक कामांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलनाचा प्रश्न हा त्या त्या भागातील बेरोजगारी निर्मुलनावर अवलंबून असतो. ग्रामीण भागातील शेती व शेतीवर आधारित ग्रामीण उद्योग प्रामुख्याने हंगामी स्वरुपाची असतात.त्यामुळे ग्रामीण भागातील मजुरी करणाऱ्या आदिवासी मजुरांना वर्षभर पुरेसा रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही.असेच जिल्ह्यात वरवर उद्भवणाऱ्या दुष्काळ परिस्थितीतून ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न अधिक तीव्र बनतो. त्यामुळे ग्रामीण भागातील आदिवासी मजुरांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी एक सुयोग्य योजना असावी. हे उदिष्टे डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने १९७२ साली महाराष्ट्र रोजगार हमी योजना (रोहोयो) सुरु करण्यात आले. सन १९७२ मध्ये पडलेल्या दुष्काळाच्या संकटावर मात करून लोकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हरितक्रांतीचे जनक मा. वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजनेची पायाभरणी केली त्यामुळे त्यांना रोजगार हमी योजनेचे जनक मानले जाते. रोजगार नसलेल्या लोकांना वर्षातून किमान ठराविक दिवस रोजगाराची हमी देणारी ही योजना आहे. या योजनेसाठी नोदणी केलेल्या लोकांना ठराविक दिवस रोजगार व त्या बदल्यात रोख रक्कम आणि अन्नधान्य अशा स्वरुपात रोजगार दिला जातो.

नाशिक जिल्हा हा सह्याद्रीच्या कुशीत उगम पावणाऱ्या गोदावरी नदीच्या काठी नाशिक हे शहर वसलेले आहे. नाशिक हे शहर पुरातनकाळापासून पवित्र क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. पौराणिक उल्लेखानुसार नाशिक जिल्ह्याचा संबंध थेट रामायाणाशी जोडला जातो.प्रभू रामचंद्राच्या वनवासातील काही वर्षांचे पावन वास्तव्य नाशिक परिसरातील गोदावरी नदीच्या तीरावर पंचवटीत होते. तसेच रामायण काळाच्या पाउलखुणा नाशिक जिल्ह्याच्या जागोजागी आढळतात. सद्याचा नाशिक जिल्ह्याचे स्थान १८.३३ ते २०.५३ या उत्तर अक्षांश व ७३.१६ व ७५.१६ पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यात वसलेला आहे. जिल्ह्याची सरासरी उत्तर दक्षिण लांबी १२० कि.मी. असून पूर्व-पश्चिम लांबी २०० कि.मी. आहे.

**संशोधनाची उदिष्टे :**

१) नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील रोजगार हमी योजनेंतर्गत चालणाऱ्या कामाचा आढावा घेणे.

२) नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील रोजगार हमी योजनेची प्रगती अभ्यासणे.

प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील ज्या सात तालुक्यात आदिवासी लोकसंख्या अधिक आहे. त्या तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेचे अंमलबजावणी कशा प्रकारे झाली याचे सविस्तर अध्ययन या संशोधनात करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या अधिक दिसून आली. हे तक्ता क्रं. १.१ वरून स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्रं. १.१ नाशिक जिल्ह्यातीलआदिवासी लोकसंख्या**

**जिल्हा :- नाशिक** **संदर्भ वर्ष:- १९८१-२०११**

| अं.क्रं. | वर्ष | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी | आदिवासी लोकसंख्येचा वृद्धीदर |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९८१ | २९९१ | ७०२ | २३.४७ | - |
| २) | १९९१ | ३८५१ | ९३१ | २४.१७ | ०.७ |
| ३) | २००१ | ४९९४ | ११९४ | २३.९० | -०.२७ |
| ४) | २०११ | ६१०७ | १५६४ | २५.६० | १.७ |
| **एकूण** | | **१७९४३** | **४३९१** | **२४.४७** | **२.१३** |
| **आधार : जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार** | | | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यातील एकूण चार दशकातील एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी दिलेली आहे. सन १९८१ मध्ये आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी ही २३.४७ टक्के इतकी राहिली आहे. तिच १९९१ मध्ये २४.१७ टक्के,२००१ मध्ये २३.९० टक्के तर २०११ मध्ये २५.६० टक्के इतकी राहली आहे. तर १९८१ ते १९९१ च्या काळात आदिवासी लोकसंख्येचा वृद्धीदर हा ०.७ टक्यांनी वाढला आहे. तर २००१ मध्ये तो ०.२७ टक्के इतका कमी झाला. आणि २०११ मध्ये परत १.७ टक्यांनी वाढताना दिसून आला. थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या ही कमी अधिक प्रमाणत वाढताना दिसून आली.

नाशिक जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. परंतु काही तालुक्यात अधिक तर काही तालुक्यात कमी प्रमाणत आदिवासी लोकसंख्या दिसून आली. त्यातील ज्या सात तालुक्यात आदिवासी लोकसंख्या अधिक प्रमाणत आहे. त्या तालुक्यातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या पुढील तक्ता क्रं. १.२ वरून स्पष्ट करत येईल.

**तक्ता क्रं. १.२ नाशिक जिल्ह्यातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या**

**जिल्हा :- नाशिक** **संदर्भ वर्ष:-२०११**

| अं.क्रं. | तालुके | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | बागलाण | ३७४४३५ | १४९८४६ | ४०.०१ |
| २) | कळवण | २०८३६२ | १४३६५६ | ६८.९४ |
| ३) | दिंडोरी | ३१५७०९ | १७५४५४ | ५५.५७ |
| ४) | सुरगाणा | १७५८१६ | १६९६८८ | ९६.५१ |
| ५) | पेठ | ११९८३८ | ११५५७६ | ९६.४४ |
| ६) | त्र्यंबकेश्वर | १६८४२३ | १३५०७८ | ८०.२० |
| ७) | इगतपुरी | २५३५१३ | १०२३०८ | ४०.३५ |
| **एकूण** | | **१६१६०९६** | **९९१६०६** | **६१.३५** |
| **आधार : जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार** | | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा आणि पेठ तालुक्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जवळ जवळ ९६ टक्के इतके अधिक आहे. तर त्या खालोखाल त्र्यंबकेश्वर तालुक्यात ८०.२० टक्के, कळवण तालुक्यात ६८.९४ टक्के तर दिंडोरी तालुक्यात ५५.५७ टक्के लोकसंख्या ही आदिवासी आहे. तर बागलाण आणि इगतपुरी तालुक्यात ४० टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. थोडक्यात असे दिसते की, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा आणि पेठ या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या अधिक आहे. तर बागलाण आणि इगतपुरी तालुक्यात आदिवासी लोकसंख्या कमी प्रमाणत दिसून आली.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र हे आदिपासुनच अति दुर्गम आणि मागास आहे. त्यामुळे तेथील आदिवासी लोकांचा पाहिजे तेवढा विकास झाला नाही. तेथील आदिवासी लोकांना आजही शेती आणि शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. त्यामुळे या आदिवासी क्षेत्रातील लोकांचा विकास करण्यासाठी व त्याने जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात दर वर्षी रोजगार हमी योजना राबवली जाते. त्याच प्रमाणे नाशिक जिल्ह्यात देखील या योजनेच्या माध्यमातून आदिवासी लोकांना वर्षातून किमान १०० दिवस रोजगार देण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच या योजनेतून किमान २५२ रु. प्रती दिवस मजुरी दिली जाते. तसेच योजनेच्या माध्यमातून आदिवासी लोकांना वेगवेगळ्या कामांतर्गत रोजगार देण्याचा प्रत्यन शासनाने केलेला आहे. त्यातील काही ठराविक कामे पुढील तक्ता क्रं.१.३ वरून स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्रं. १.३ नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली कामे**

**जिल्हा :- नाशिक** **संदर्भ वर्ष:-२०२१-२२**

| अं.क्रं. | कामाची वर्गवारी | कामांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण काम | पूर्ण झालेले काम | अपूर्ण राहिलेले काम | झालेला खर्च (लाखात) |
| १) | जलसंधारण | ९७४ | २२७ | ७४७ | २०४ |
| २) | पाणलोट विकास | २३५ | ५५ | १८० | ९८ |
| ३) | सिंचन | १२३३ | ६८ | ११६५ | ८४७ |
| ४) | वनीकरण | ८२८ | ११ | ८१७ | ४२७ |
| ५) | ग्रामीण स्वच्छता | ८३६ | ६६ | ७७० | ११२ |
| ६) | रस्ता जोडणी / रस्ते | १२५६ | ५ | १२५१ | १०८६ |
| **एकूण** | | **५३६२** | **४३२** | **४९३०** | **२७७४** |

**आधार:- उपजिल्हाधिकारी (रोहोयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत २०२१-२२ या वर्षात घेतलेल्या कामांचा तपशील दर्शविला आहे. नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत अनेक प्रकारची कामे केली जातात त्यातील २०२१-२२ या आर्थिक वर्षात जलसंधारणाची एकूण ९७४ कामांची मंजुरी मिळाली. त्यापैकी २२७ कामे पूर्ण झाले असून त्यावर एकूण २०४ लाख रुपये इतका खर्च झाला. व ७४७ कामे अपूर्ण राहिली आहेत. तसेच तर पाणलोट विकास क्षेत्रासाठी २३५ कामांची मंजुरी मिळाली. त्यापैकी एकूण ५५ कामे पूर्ण झाली असून त्यावरील एकूण खर्च ९८ लाख रुपये इतका खर्च झाला. तर १८० कामे अपूर्ण आहेत. तसेच सिंचन क्षेत्रासाठी १२३३ कामांची मजुरी मिळाली. त्यापैकी ६८ कामे पूर्ण झाली असून त्यावर ८४७ लाख रुपये इतका खर्च झाला. व ११६५ एवढी कामे अपूर्ण आहेत. वनीकरण क्षेत्रासाठी ८२८ कामांना मंजुरी मिळाली त्यापैकी ११ कामे पूर्ण झाली व त्यावर ४२७ लाख रु खर्च झाले. ८१७ कामे अपूर्ण आहे. ग्रामीण स्वच्छता क्षेत्रासाठी ८३६ कामांची मंजुरी मिळाली. त्यापैकी ६६ कामे पूर्ण झाली असून त्यावर ११२ लाख रु. इतका खर्च झाला. रस्ते जोडणी विकास कामांतर्गत ९८८ कामांची मंजुरी मिळाली. त्यापैकी ५ कामे पूर्ण झाली असून त्यावर १०८६ लाख रु. खर्च झाला. व १२५१ कामे अपूर्ण राहिली आहेत. अशी नाशिक जिल्ह्यात एकूण ५३६२ कामांना मंजुरी मिळाली त्यापैकी ४३२ कामे पूर्ण झाली असून त्यावर २७७४ लाख रु. खर्च झाला आहे. व ४९३० कामे अपूर्ण राहिली. थोडक्यात यावरून असे दिसते की, रोजगार हमी योजनेमार्फत अनेक शासकीय कामांना मंजुरी मिळते व त्यापैकी बहुतांह कामातून आदिवासी लोकांना काम उपलब्ध होते.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या असलेल्या तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत १०० दिवस रोजगार देऊ केलेल्या कुटुंबांपेक्षा १०० दिवस रोजगार मिळालेल्या कुटुंबाची संख्या कमी दिसून आली. हे तक्ता क्रं. १.४ वरून स्पष्ट करत येईल.

**तक्ता क्रं. १.४ नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत दिलेला रोजगार**

**जिल्हा :- नाशिक** **संदर्भ वर्ष:-२०२१-२२**

| अं.क्रं. | तालुके | रोजगार देऊ केलेलीआणि प्रत्यक्ष रोजगार पुरविलेला कुटुंबाची संख्या | रोजगार देऊ केलेलीआणि प्रत्यक्ष रोजगार पुरविलेला व्यक्तींची संख्या | १०० दिवस रोजगार मिळालेली कुटुंबाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १) | बागलाण | ९७३२ | १६०७२ | ३६६ |
| २) | कळवण | ७६५६ | १३०११ | १७५ |
| ३) | दिंडोरी | ५०३७ | १०२८१ | १२२ |
| ४) | सुरगाणा | ९३१३ | १९१३० | २३१ |
| ५) | पेठ | ७८२५ | १५४५६ | ५५५ |
| ६) | त्रंबकेश्वर | ७६६८ | १५३७४ | २९२ |
| ७) | इगतपुरी | ४८४८ | ८६२६ | १८२ |
| **एकूण** | | **५२०७९** | **९७९५०** | **१९२३** |
| **आधार:- उपजिल्हाधिकारी (रोहोयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक** | | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, प्रत्येक तालुक्यात रोजगार देऊ केलीली आणि प्रत्येक्षात रोजगार पुरवलेली कुटुंबाची संख्या आणि १०० दिवस रोजगार मिळणाऱ्या कुटुंबाची संख्या दर्शवली आहे. त्यात बागलाण तालुक्यात रोजगार देऊ केलेली कुटुंब संख्या ९७३२ इतकी असून प्रत्येक्ष रोजगार पुरवलेल्या व्यक्तींची संख्या १६०७२ एवढी आहे. व १०० दिवस रोजगार मिळणाऱ्या कुटुंबाची संख्या ३६६ इतकी आहे. त्या प्रमाणे अनुक्रमे कळवण ,दिंडोरी, सुरगाणा, पेठ, त्रंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यात रोजगार देऊ केलेली कुटुंबे अनुक्रमे ७६५६, ५०३७, ९३१३, ७८२५, ७६६८ आणि ४८४८ इतकी असून प्रत्येक्ष रोजगार पुरवलेली व्यक्तींची संख्या अनुक्रमे १३०११, १०२८१, १९१३०, १५४५६, १५३७४ आणि ८६२६ इतकी आहे. व प्रत्येक्षात १०० दिवस रोजगार मिळणाऱ्या कुटुंबांची संख्या अनुक्रमे १७५,१२२, २३१, ५५५, २९२ आणि १८२ इतकी आहे. थोडक्यात असे दिसते की, एकूण ७ तालुक्यातील रोजगार देऊ केलेल्या ५२०७९ कुटुंबांपैकी १९२३ इतक्या कुटुंबांचा १०० दिवस रोजगार प्राप्त झाला. म्हणजेच १०० दिवस रोजगार मिळालेल्या कुटुंबाची संख्या कमी दिसून आली.

नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या वेगवेगळ्या कामांवर झालेला एकूण खर्च व कामांची टक्केवारी तक्ता क्रं. १.५ वरून स्पष्ट करत येईल.

**तक्ता क्रं. १.५ नाशिक जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेची प्रगती**

**जिल्हा :- नाशिक** **संदर्भ वर्ष:-२०२१-२२**

| अं.क्रं. | तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १) | रोजगार पुरवलेल्या कुटुंबाची संख्या (लाखात) | ०.७९ | ०.९१ |
| २) | प्रती कुटुंब सरासरी रोजगार (कोटीत) | ३०.६२ | २८.७७ |
| ३) | अनुसूचित जाती टक्केवारी | २.०९ | २.५ |
| ४) | अनुसूचित जमातीची टक्केवारी | ४८.३४ | ३८.३ |
| ५) | पूर्ण झालेल्या कामांची संख्या | १६५६३ | २४१५ |
| ६) | आर्थिक वर्षातील एकूण खर्च (कोटी) | ७२.१६ | ६६.८२ |
| **आधार:- उपजिल्हाधिकारी (रोहोयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक** | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत २०२०-२१ या वर्षात रोजगार पुरवलेल्या कुटुंबाची संख्या ०.७९ लाख इतकी होती ती २०२१-२२ या वर्षात ती ०.९१ लाख रु. झाली. तसेच २०२०-२१ मध्ये प्रती कुटुंब सरासरी रोजगार ३०.६० दिवस मिळाला तर २०२१-२२ मध्ये २८.७७ दिवस रोजगार मिळाला. २०२०-२१ मध्ये अनुसूचित जातीला २.०९ टक्के रोजगार मिळाला. तर २०२१-२२ मध्ये २.५ टक्के रोजगार मिळाला. तसेच २०२०-२१ मध्ये अनुसूचित जमतीला ४८.३४ टक्के रोजगार मिळाला. तर २०२१-२२ मध्ये ३८.३ टक्के रोजगार मिळाला. तर २०२०-२१ (रोहोयो) योजनेमार्फत १६५६३ कामे पूर्ण केली गेली तर २०२१-२२ मध्ये २४१५ कामे पूर्ण करण्यात आली. तसेच २०२०-२१ या आर्थिक वर्षात (रोहोयो) योजनेंतर्गत ७२.१६ कोटी रुपये खर्च झाले तर २०२१-२२ मध्ये ६६.८२ कोटी रुपये खर्च झाले. यावरून असे दिसते की, नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात रोजगार हमी योजनेंतर्गत अनेक कामे केली जातात. त्यातून अनुसूचित जमातीच्या कामांची टक्केवारी २०२०-२१ मध्ये ४८.३४ टक्के तर २०२१-२२ मध्ये ३८.३ टक्के इतकी कमी आहे. म्हणजेच एकूण नाशिक जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेची प्रगतीचे काम चांगले असले तरी आदिवासी भागात मात्र रोजगार हमी योजनेची प्रगती कमी प्रमाणत आहे.

**निष्कर्ष :** नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत वेगवेगळी कामे केली जातात. त्या कामांचा आढावा घेतला असता. २०२१-२२ या आर्थिक वर्षात ५३६२ हजार कामे मंजूर झाली. परंतु त्यातून ८.०५ टक्के इतके कमी काम पूर्ण झाले आहे. खरे तर जिल्ह्यातील बेकारी कमी करणे, दारिद्रय कमी करणे, आदिवासी भागातील लोकांना १०० दिवस रोजगार पुरवणे व जिल्ह्यातील आदिवासी भागातील स्थलांतर करणे हे रोजगार हमी योजनेचे उदिष्टे आहे. परंतु प्रत्येकक्षात मात्र मोजक्या लोकांना काम मिळते. तसेच नाशिक जिल्ह्यातील बागलाण, कळवण, दिंडोरी, सुरगाणा, पेठ, त्रंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या प्रगतीची टक्केवारी कमी आहे. कारण अनुसूचित जमातीच्या कामांची टक्केवारी २०२०-२१ मध्ये ४८.३४ टक्के तर २०२१-२२ मध्ये ३८.३ टक्के इतकी कमी दिसून आली.

**संदर्भ:**

१) सामाजिक आर्थिक सामलोचन, नाशिक जिल्हा
२) आदिवासी विकास विभाग, नाशिक
३) रोजगार हमी योजना, उपजिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
५) https://maharashtra.gov.in